# मिरा भाईंदर महानगरपालिका

## सामान्य प्रशासन विभाग

मुख्यालय, पहिला मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) दूरध्वनी क्र.022-28192828 ई-मेल आयडी gad@mbmc.gov.in


जा. क्र. मनपा/सा.प्र./२५६/२०२६-२७ दि.२०/०८/२०२६

## // परिपत्रक //

**प्रति.**

**सर्व खाते प्रमुख / विभाग प्रमुख**

**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

| | |
|---|---|
| **विषय :-** | **महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त होणारे शासन निर्णय, शासन परिपत्रके,अधिसूचना, आदेश व इतर महत्वाची पत्रे महासभा कामकाजाकरीता सचिव कार्यालयास उपलब्ध करुन देणे.** |
| **संदर्भ :-** | **जा.क्र.मनपा/उपायुक्त(मु.)/१३०/२०२६-२७ यांचे दि.२९/०७/२०२६ रोजीचे पत्र.** |

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये महाराष्ट्र शासन तसेच केंद्र शासनाकडून वेळोवेळी शासन निर्णय, शासन परिपत्रके, अधिसूचना, शासन आदेश व इतर महत्त्वाची पत्रे महानगरपालिकेस प्राप्त होत असतात. सदर शासन निर्णय व इतर महत्त्वाच्या पत्रांची माहिती सन्माननीय पालिका सदस्यांना महासभा कामकाजाच्या अनुषंगाने उपलब्ध करून देणेबाबत कळविण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने, महानगरपालिकेस प्राप्त होणारे सर्व शासन निर्णय, शासन परिपत्रके, अधिसूचना, शासन आदेश व इतर महत्त्वाची पत्रे यांची नोंद व संकलन करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागामार्फत ऑनलाईन GOOGLE SHEET लिंकद्वारे डिजिटल नोंदवही तयार करण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने सर्व खाते प्रमुख / विभाग प्रमुख यांना कळविण्यात येते कि, आपल्या विभागाशी संबंधित प्राप्त होणारे शासन निर्णय, शासन परिपत्रके, अधिसूचना, शासन आदेश व इतर महत्त्वाची पत्रे विभागनिहाय सदर ऑनलाईन GOOGLE SHEET लिंकवरील डिजिटल नोंदवहीमध्ये नियमितपणे व अद्ययावत स्वरूपात नोंदवून उपलब्ध करून द्यावीत.

जेणेकरुन सचिव कार्यालयास महासभेपूर्वी आवश्यक असणारे शासन निर्णय, शासन परिपत्रके, अधिसूचना, शासन आदेश व इतर महत्त्वाची पत्रे उपलब्ध होतील. सदर बाबी वेळोवेळी अद्यावत व उपलब्ध करण्याची जबाबदारी संबंधित विभागाची असेल. तसेच सदर बाबी वेळोवेळी अद्यावत व उपलब्ध न झाल्यास

संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्याविरुद्ध नियमानुसार शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल. याची स्पष्ट नोंद घ्यावी. सदर परिपत्रक तत्काळ प्रभावाने लागु करण्यात येत असुन सदर बाबीस प्राधान्य देऊन आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

(डॉ सचिन बांगर)
उप-आयुक्त (मु.)
मिराभाईंदर महानगरपालिका

**सोबत : ऑनलाईन GOOLE SHEET**
**लिंक जोडून देण्यात येत आहे.**
**https://docs.google.com/spreadsheets**

**प्रत माहितीस्तव :**

१. **मा.आयुल्क्त महोदय, मि.भा.मनपा**
२. **मा.अति.आयुक्त (१ व २) मि.भा.मनपा**

# मिरा भाईंदर महानगरपालिका – सामान्य प्रशासन विभाग – कागदपत्रांची डिजिटल नोंद

## शासन निर्णय / परिपत्रक / अधिसूचना / आदेश डिजिटल नोंदवही

| अ.क्र. | विभागाचे नाव | दिनांक | विषय | शासन निर्णय / परिपत्रक / आदेश क्रमांक | डिजिटल फाईल / लिंक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | सामान्य प्रशासन विभाग | 20-08-2026 | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील दशमाँ सणाच्या अनुषंगाने दशमाँ मूर्ती विसर्जनाकरीता नागरिकांना आवश्यक सुचना देण्याबाबत. | जा. क्र. मनपा/सा.प्र./२५४/२०२६-२७ यांचे दि.२०/०८/२०२६ रोजीचे प्रसिध्दीपत्रक | https://drive.google.com/file/d/1LcDsw9fYE6yXfPB-QVGdthpaJiPy7-cU/view?usp=sharing | |
| 2 | | | | | | |
| 3 | | | | | | |
| 4 | | | | | | |
| 5 | | | | | | |
| 6 | | | | | | |
| 7 | | | | | | |
| 8 | | | | | | |
| 9 | | | | | | |
| 10 | | | | | | |